# पिकासाठी पाण्यात विरघळणाऱ्या खतांचा वापर व शेतकऱ्यांचे तोट्याचे अर्थशास्त्र

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

टोमॅटो, वांगी, भेंडी, मिरची, काकडी, खरबूज, टरबूज ई. भाजीपाला व विविध फळपिके आणि जास्त उत्पादन क्षमता असलेल्या पिकांचे खत व्यवस्थापन करताना शेतकरी मशागतीच्या वेळी शेणखत, संयुक्त खताचे एकरी 1 ते 2 बॅग, सूक्ष्म अन्नद्रव्ये निंबोळी 100 ते 200 किलो मातीत मिसळून देता लागवडीनंतर पीक 5 - 10 दिवसाचे झाल्यापासून पीक फुलोऱ्यात येईपर्यंत व पुन्हा प्रत्येक तोडणीनंतर पाण्यात विरघळणारी खते (NPK), पिकास आठवड्यातून 1 वेळेस किंवा प्रत्येक तोडणीनंतर ठिबक मधून देत असतात. वर नमूद केलेल्या 6 ते 8 महिने तोडे होणाऱ्या भाजीपाला पिकांसाठी व फळबागेस बहार धरल्यानंतर काढणीपर्यंत - अशा प्रकारची अन्नद्रव्ये देण्याचा सर्वत्र प्रथा आहे.



बेसल डोस जर व्यवस्थितरीत्या दिला असेल तर पुन्हा या महागड्या, पाण्यात विरघळणाऱ्या खतांची गरज आहे का ? याचा पुनर्विचार करण्याची खरी गरज आहे. ही खते किलो, 5 किलो, व 25 किलो चे पॅकिंग मध्ये मिळतात. त्याचे दर हे संयुक्त खताचे (मातीत मिसळून द्यावयाचे) तुलनेने खूप जास्त आहेत आणि हे खते लागवडीनंतर प्रत्येक आठवड्यास एकरी 5 किलो या प्रमाणे दिली जातात. यांचा एकंदरीत खर्च खूप मोठ्या प्रमाणात होतो. वास्तविक पाहता पाण्यात विरघळणारी खते फवारणी द्वारे पिकांवर जैविक व अजैविक ताण आल्यावर देणे आवश्यक असते पिकावर विविध प्रकारचे जैविक व अजैविक ताण पुढील कारणामुळे येतात जसे की प्रतिकूल हवामान, अति उच्च किंवा कमी तापमान, कीड रोगांचा प्रार्दूभाव, अवकाळी, अति पाऊस ई.

शक्यतो या खतांचा वापर टाळलेलाच चांगला. तरीसुध्दा जी पीके 6/8/9 महिने शेतात राहतात जसे की वांगी, टोमॅटो, मिरची या पिकांसाठी या पाण्यात विरघळणाऱ्या खतांचा वापर कसा करावा याबाबत खालील प्रमाणे तक्ता तयार केलेला आहे. ज्या शेतकऱ्यांना जास्त गुंतवणूक करावयाची आहे त्यांनी त्याचा वापर करावा.

लागवडीनंतर 15 व्या दिवशी 19:19:19 2 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 20 व्या दिवशी 19:19:19 3 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 25 व्या दिवशी 19:19:19 4 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 30 व्या दिवशी 19:19:19 5 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 35 व्या दिवशी 12:61:0 5 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 40 व्या दिवशी 13:40:13 5 किलो प्रति एकर
लागवडीनंतर 45 व्या दिवशी 0:52:34 5 किलो प्रति एकर

पहिला तोडा झाल्यावर व प्रत्येक तोड्यानंतर पुढील प्रमाणे खताची मात्रा द्यावी.
12:61:00 - 5 किलो प्रति एकर किंवा 17:44:0 - 5 किलो प्रति एकर
13:00:45 - 5 किलो प्रति एकर किंवा 17:44:0 - 5 किलो प्रति एकर
00:00:50 - 5 किलो प्रति एकर किंवा 17:44:0 - 5 किलो प्रति एकर
पोटॅशियम शोनाईट- 5 किलो प्रति एकर तसेच

दर महिन्यात - 5 किलो कॅल्शियम नायट्रेट, मॅग्नेशियम सल्फेट 5 किलो, सल्फर 500 ग्रॅम.
दर महिन्याला- 5 किलो चिलेटेड सुक्ष्मअन्नद्रव्य - ग्रेड-II ठिबकमधून द्यावे

वरील प्रमाणे पाण्यात विरघळणारी खते ठिबक मधून देण्यासाठी उच्च उत्पादनक्षम वाण असलेल्या मिरची, टोमॅटो, काकडी, वांगी, भेंडी, खरबूज, टरबूज इत्यादी पिकांना दिल्यास उच्च गुणवत्तेचे व भरपूर उत्पादन येते परंतू यावरील उत्पादन खर्च खूप वाढतो. उत्पादित मालाला चांगला बाजारभाव मिळाला किंवा निर्यातक्षम उत्पादनासाठी ही खते शेतकऱ्यांना परवडू शकतात अन्यथा आतबट्टयाचा व्यवहार होऊन प्रसंगी तोटा सहन करावा लागतो. यासाठी बाजारातील दर व एकंदरीत उत्पादन खर्च व मिळणारे निव्वळ उत्पन्न म्हणजेच नफा याचा सांगोपांग विचार करावा व आपली शेती फायद्याची राहील असे पाहावे.

जर ज्ञानाच्या शेतीची कास धरून ज्ञान व कौशल्य आत्मसात केली तर मात्र यामधून काही चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे नाहीतर शेतकरी दिवस रात्र शेतात राब-राब राबून स्वत: घाम गाळतो परंतू त्याचे पदरात मात्र काहीच शिल्लक राहत नाही व त्याचे जिवावर ईतर सर्व मंडळी जसे की कृषी निविष्ठा उत्पादक, विक्रेते व ग्राहक गब्बर होत चालले आहेत व त्यांना पोसण्याचे काम तेवढे शेतकरी करत आहेत.




फायद्याची व आरोग्यदायी..!